# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-२.

रजि. ऑफीस आदिवासी विकास भवन, २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.
दुरध्वनी - ०२५३-२३१५८६०, फॅक्स - (०२५३) २३१५८६०
Mail :- shabarinsk@gmail.com


## -: संचालक मंडळ सभा इतिवृत्त :-

दि.२३/०१/२०२३ रोजी मा.मंत्री, आदिवासी विकास तथा अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., यांचे अध्यक्षतेखाली दुपारी २.०० वाजता मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेस खालील संचालक / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | हुद्दा | उपस्थित / अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १ | मा.नामदार डॉ. विजयकुमार गावित<br>अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक तथा मा.मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | मा.श्री.डॉ.प्रदिप व्यास<br>अपर मुख्य सचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक | उपस्थित |
| ३ | मा.श्रीमती नयना गुंडे<br>आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक | संचालक | उपस्थित |
| ४ | मा.श्री.रविंद्र जाधव<br>उपसचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक | उपस्थित |
| ५ | मा.श्रीमती लीना बनसोड<br>व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक | सदस्य सचिव | उपस्थित |

मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने संचालक मंडळाचे सभेस सुरुवात केली आहे.

**विषय क्र. १ :- दिनांक ३०/०९/२०२२ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त कायम करणे.**

दि.३०/०९/२०२२ रोजी मा.अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ तथा मंत्री, आदिवासी विकास यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त तसेच सदर सभेमध्ये पारित झालेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभेस व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१ :- दि.३०/०९/२०२२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे. व ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२०-२१ चे प्रारुप अंतिम लेख्यास मंजुरी देणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२०-२१ चे लेखे तयार केलेले असुन सदरच्या अहवाल वर्षातील ठळक बाबी खालील प्रमाणे आहेत.

(रुपये लक्ष)

| अ.क्र | तपशिल | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|
| १ | भागभांडवल | ७७११.२१ | ८७११.२१ |
| २ | भाग आवेदन रक्कम (Share Application Money) | १००.९७ | ०.०० |
| ३ | भाग आवेदन रक्कम प्रलंबित वाटप (Share Application Money Pending Allotment) | १०००.०० | १००.९७ |
| ४ | उलाढाल | ९२२.८७ | ७३०.२६ |
| ५ | नक्त संपत्ती (Net Worth) | १२१३२.३३ | १२४८९.८९ |
| ६ | राखीव निधी (Reserve & Surplus) | ७७५.३३ | ११३२.८९ |
| ७ | कर्ज देणे (NSTFDC, New Delhi Outstanding) | ११६७.७४ | १२०१.४६ |
| ८ | कर्ज येणे (Loans to Beneficiaries) | ८०२८.८३ | ८३४६.११ |
| ९ | गुंतवणुक व बॅंक शिल्लक | १२२३७.४० | २१८४१.४६ |
| १० | देणे तरतुद | २९५.८८ | ३०४.५७ |
| ११ | स्थायी मालमत्ता | ३२.३६ | २९.९० |
| १२ | नफा | ४०६.३० | ३५७.५५ |

अहवाल वर्षात शबरी महामंडळास रु.३५७.५५ लक्ष इतका संभाव्य निव्वळ नफा झालेला आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०२०-२१ चे अंतिम लेखे संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर. संचालक मंडळाच्या मान्यतेनंतर मा.महालेखापाल कार्यालय, नवी दिल्ली यांचेकडून नियुक्त करण्यात आलेल्या एल.के. सराफ अँण्ड कंपनी, संवैधानिक लेखापरिक्षक, नाशिक यांचेकडे सदरचे अंतिम लेखे लेखापरिक्षणासाठी पाठविण्यास सभेकडुन मंजुरी मिळणेस विनंती.

**ठराव क्र.२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या सन २०२० - २१ या आर्थिक वर्षाच्या अंतिम लेख्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे व सदरचे अंतिम लेखे महामंडळाचे संवैधानिक लेखापरीक्षक एल.के. सराफ अँण्ड कंपनी, सनदी लेखापाल, नाशिक यांचेकडे लेखापरीक्षणासाठी पाठविण्यास सभेकडून मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सर्व उपस्थित संचालकांचे आभार मानुन मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले आहे.

व्यवस्थापक (प्रकल्प) -

मा.महाव्यवस्थापक (प्रशासन)

मा.महाव्यवस्थापक (वित्त)

मा.व्यवस्थापकीय संचालक

मा.अध्यक्ष सो,
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक.